लोकमत

## जिल्ह्यातही होणार कार्यक्रम : निवडणूक शाखेचा उपक्रम

# आनंद विद्यालयात चुनाव पाठशाला

लोकमत न्यूज नेटवर्क




**सावेडी येथील आनंद विद्यालयात चुनाव पाठशाला कार्यशाळेत मतदारांना ओळखपत्रांचे वाटप करण्यात आले.**

**अहमदनगर :** लोकसभा निवडणुकीसाठी जिल्हा निवडणूक यंत्रणेची लगबग सुरु आहे. त्याचबरोबर मतदारांना मतदानप्रक्रियेची ओळख व्हावी, यासाठी चुनाव पाठशालासारख्या उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमांना नागरिकांचाही चांगला प्रतिसाद मिळत आहे. नुकतीच सावेडी येथील आनंद विद्यालयात ही पाठशाला झाली.

जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी राहुल द्विवेदी यांच्या निर्देशानुसार मतदारांमध्ये जनजागृतीसाठी विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत.

नुकताच जिल्हाधिकारी द्विवेदी यांचा 'टॉक वुईथ कलेक्टर'हा विद्यार्थ्यांशी संवादाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. त्यास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. त्यानंतर तालुका व गावपातळीवर निवडणूक यंत्रणेच्या वतीने चुनाव पाठशाला आयोजित करण्यात येत आहेत.

मतदार यादीचे वाचन, नवमतदारांना ओळखपत्राचे वाटप (ईपीक कार्ड), दिव्यांग मतदारांचे वाचन आणि त्यांना पीडब्ल्यूडी ॲपची माहिती देणे, ९० वर्षांवरील मतदारांचे वाचन, नवमतदारांना मतदानाचे महत्व विशद करणे आदी उपक्रम या चुनाव पाठशालामध्ये आयोजित करण्यात येत आहेत. याशिवाय बुथस्तरीय एजंटांना त्यांची भूमिकाही यावेळी समजावून सांगण्यात येत आहे. अधिकाधिक गावांमध्ये ही चुनाव पाठशाला बुथस्तरीय अधिकाऱ्यांमार्फत आयोजित करण्यात येत असून त्यास मिळणारा प्रतिसाद हा निवडणूक प्रक्रियेविषयी जनजागृती वाढवण्यास साह्यभूत ठरत आहे.

अहमदनगर आणि शिर्डी या दोन्ही मतदारसंघांतील विविध गावामंध्ये ही चुनाव पाठशाला आयोजित करण्यात येत आहे. शनिवारी सावेडी येथील आनंद विद्यालयात झालेल्या या कार्यक्रमात झोनल अधिकारी विलास गायकवाड, केंद्रस्तरीय अधिकारी नंदकुमार नेमाने, अंकुश कोतकर, मंजाबापू लहारे, भास्कर ताकपेरे, अभय ठाणगे, प्राची वराट यांनी चुनाव कार्यशाळेचे आयोजन करून परिसरातील मतदारांना मतदार यादी वाचून दाखविली. तसेच मतदान ओळखपत्रांचे वाटप केले. शेवटी मतदारांना मतदानविषयी गोपनीयतेची शपथ दिली.

# जिल्हाधिकाऱ्यांनी साधला विद्यार्थ्यांशी संवाद

**नगर (प्रतिनिधी) :** निवडणुकीचे महत्त्व, मतदानाची जबाबदारी, युवा मतदारांचे कर्तव्य, निवडणूक प्रक्रिया, ईव्हीएमची पारदर्शकता अशा एक ना अनेक विषयांवर जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी राहुल द्विवेदी यांनी विद्यार्थ्यांशी मनमोकळा संवाद साधला. विद्यार्थ्यांच्या प्रत्येक शंकांचे, प्रश्नांचे निराकरण करीत या निवडणुकीत मतदानाचा हक्क बजाविण्यास विसरू नका, असे आवाहनही त्यांनी केले.



**राहुल द्विवेदी**

निमित्त होते जिल्हा निवडणूक यंत्रणेमार्फत मतदार जनजागृती (स्वीप) कार्यक्रमांतर्गत न्यू आर्टस महाविद्यालयात बुधवारी आयोजित कार्यक्रमाचे. जिल्हाधिकारी द्विवेदी यांच्या सोबत हा मुक्त संवाद चांगलाच रंगला. महाविद्यालयाचे प्राचार्य भास्कर झावरे, उपजिल्हा निवडणूक अधिकारी जितेंद्र पाटील, उपमुख्य कार्यकारी अधिकारी तथा स्वीपचे नोडल अधिकारी संजय कदम, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) लक्ष्मण पोले, तहसीलदार उन्मेष पाटील आदींची या वेळी व्यासपीठावर उपस्थिती होती.

द्विवेदी म्हणाले, "निवडणूक प्रक्रिया ही निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. निवडणुका हा त्यातील महत्त्वाचा भाग आहे. त्यासाठीची पूर्वतयारी सुरूच असते. मतदार याद्या तयार करणे खूप महत्त्वाचे असते. सुदृढ लोकशाहीसाठी मतदान हा महत्त्वाचा घटक आहे."

ईव्हीएमची पारदर्शकता आणि सुरक्षितता यावरही विद्यार्थ्यांनी प्रश्न विचारला. त्यावर जिल्हाधिकारी द्विवेदी यांनी ईव्हीएम पूर्णपणे सुरक्षित असल्याचा निर्वाळा दिला. या निवडणुकीत ईव्हीएमबरोबरच व्हीव्हीपॅट मशिन्सचा वापर होणार असल्याने मतदान अधिक सुरक्षित आणि पारदर्शक झाल्याचे त्यांनी सांगितले. मतदारदूत अमोल बागूल यांनी या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. या वेळी जिल्हाधिकाऱ्यांनी सोशल मिडीयातील वापराबाबत खात्री करुन दक्षता घ्यावी, खोट्या व सामाजिक नुकसान करणाऱ्या संदेशापासून खबरदारी घेत तरुणांनी दूर राहण्याचे आवाहन राहुल द्विवेदी यांनी केले.

# मतदान केंद्रावर मोबाईल बंदी

**नगर, दि. २३ (प्रतिनिधी) -** मतदान केंद्रावर मोबाईल वापरण्यास बंदी असून मतदान अधिकाऱ्यांनी त्यांच्या केंद्रावर कोणासही मोबाईलसह प्रवेश देऊ, नये अशा सक्त सूचना प्रशिक्षणाच्या वेळी देण्यात आल्या आहेत. कोणतीही व्यक्ती मोबाईल घेऊन मतदान केंद्रात आल्यास त्यांच्यावर गोपनीयता भंगतेचा गुन्हा दाखल करण्याच्या सूचना यावेळी देण्यात आल्या. वेळप्रसंगी केंद्रांवरील पोलिसांची मदत घेण्यात यावी, अशीही सूचना अधिकाऱ्यांना प्रशिक्षणात देण्यात आल्या आहेत.

लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०१९ च्या अनुषंगाने मतदान केंद्रस्तरीय पथकांचे प्रशिक्षण नेवासे येथे झाले. यावेळी २०८२ पैकी २००७ मतदान केंद्रस्तरीय अधिकारी उपस्थित होते. प्रशिक्षणामध्ये मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांना निवडणूक प्रक्रियेची आणि मतदान यंत्रांची सखोल माहिती देण्यात आली. सकाळी आयोजित केलेल्या प्रथम सत्रामध्ये मतदान केंद्रांवरील निवडणुकीची प्रक्रिया समजावून सांगण्यात आली. यावेळी लोकसभा निवडणुकीत पहिल्यांदाच तत्ज्ञढ यंत्राचा वापर करण्यात येणार आहे. त्यामुळे निवडणूक प्रक्रियेत झालेले बदल आणि तत्काळ हाताळणी यावर मार्गदर्शन करण्यात आले. संगणकीय सादरीकरण व प्रशिक्षण व्हिडीओच्या माध्यमातून सदर प्रशिक्षण देण्यात आले.

या प्रशिक्षणाचे दुसरे सत्र ज्ञानोदय विद्यालयामध्ये आयोजित करण्यात आले होते. यावेळी सर्व मतदान केंद्र अधिकाऱ्यांना मतदान यंत्रांच्या हाताळणीचे प्रशिक्षण देण्यात आले. यावेळी तहसील कार्यालयातील तलाठी, प्रशिक्षक व क्षेत्रीय अधिकारी उपस्थित होते. सदर प्रशिक्षणामध्ये उपजिल्हाधिकारी तथा सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी शाहूराज मोरे व तहसीलदार रुपेश सुराणा यांनी मार्गदर्शन केले. यावेळी नायब तहसीलदार दत्तात्रय भावले, शेळके आदी अधिकारी उपस्थित होते.

प्रभात Sun, 24 March 2019
epaper.eprabhat.net/c/37870788

## न्यूज ब्रीफ

### लोकसभा निवडणूक प्रशिक्षण कार्यशाळा

नगर तालुका | नगर तहसील कडून लोकसभा निवडणुक दृष्टीने ४ हजार ६०० अधिकारी आणि कर्मचारी यांची कार्यशाळा घेण्यात आली. अधिकारी क्रमांक १, २, ३ यांचे अधिकार आणि कर्तव्ये यांची माहिती तहसीलदार उमेश पाटील यांनी दिली. नंदनवन लॉन या ठिकाणी ही कार्यशाळा झाली. यावेळी प्रांताधिकारी उज्ज्वला गाडेकर, तहसीलदार उमेश पाटील, अप्पर तहसीलदार रोहिणी नरे, निवडणूक नायब तहसीलदार रावसाहेब परदेशी, वैशाली आव्हाड, अर्चना पागिरे, पंचायत समिती गट विकास अधिकारी अलका शिरसाठ उपस्थित होते. अहमदनगर शहर महानगर पालिका अंतर्गत येणाऱ्या कार्यालयातील शासकीय आणि निमशासकीय कर्मचारी कार्यशाळेत उपस्थित होते. यावेळी तहसीलदार उमेश पाटील यांनी मतदान कर्मचारी आणि अधिकारी क्रमांक १, २, ३ यांचे अधिकार आणि कर्तव्ये यांची माहिती दिली.

# मतदानप्रक्रिया जागृतीसाठी 'चुनाव पाठशाला' उपक्रम

**नगर :** लोकसभा निवडणुकीसाठी जिल्हा निवडणूक यंत्रणेने मतदारांना मतदानप्रक्रियेची ओळख होण्यासाठी 'चुनाव पाठशाला' उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. नगर व शिर्डी या दोन्ही मतदारसंघात या उपक्रमांना नागरिकांचा प्रतिसाद मिळत असल्याचे निवडणूक शाखेचे उपजिल्हाधिकारी जितेंद्र पाटील यांनी सांगितले.

मतदारांमध्ये जागृतीसाठी नुकताच जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी राहुल द्विवेदी यांचा 'टॉक वुईथ कलेक्टर' हा विद्यार्थ्यांशी संवादाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. त्याला चांगला प्रतिसाद मिळाला. त्यानंतर तालुका व गावपातळीवर निवडणूक यंत्रणेच्या वतीने 'चुनाव पाठशाला' आयोजित करण्यात येत आहेत.

मतदार यादीचे वाचन, नवमतदारांना ओळखपत्राचे वाटप (ईपीक कार्ड), दिव्यांग मतदारांचे वाचन आणि त्यांना 'पीडब्ल्यूडी ॲप'ची माहिती देणे, ९९ वर्षावरील मतदारांचे वाचन, नवमतदारांना मतदानाचे महत्त्व विशद करणे आदी उपक्रम या चुनाव पाठशालामध्ये आयोजित करण्यात येत आहेत. याशिवाय बूथस्तरीय एजंटना त्यांची भूमिकाही समजावून सांगण्यात येते.